**अंबानगरी सोसायटी विश्रांतवाडी पुणे येथे दोन महीन्यांपुर्वी वृध्द महीलेची निर्घृण हत्या करुन फरार असलेला आरोपी मनिष चड्डा यास गुन्हे शाखा व विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पोलीसांनी धनबाद,झारखंड राज्य येथुन अटक करुन दाखल गुन्हा उघडकीस आणला आहे.**

---

दिनांक ३०/०९/२०१७ रोजी १५.४५ ते २२.३० वा.चे दरम्यान अंबानगरी सहकारी सोसायटी बिल्डींग नं. १० फ्लॅट नं.१० धानोरी रोड पुणे. येथे रहाणा-या वयोवृध्द महीला दिवंगत राधा माधवन नायर वय ७१ वर्षे यांची चोरीच्या उद्देशाने आरोपी मनिष चड्डा रा. खडकी पुणे याने कटरच्या सहाय्याने गळा चिरुन निर्घूण हत्या करुन त्यांचे अंगावरील किंमत रुपये १,५०,०००/- चे सोन्याचे दागीने जबरी चोरी करुन फरार झाला होता. प्रस्तुत प्रकरणी विश्रांतवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ३५२/२०१७ भा.द.वि. कलम ३०२, ४४९,३९४ प्रमाणे दाखल आहे.

अतिशय गंभिर स्वरुपाचा गुन्हा असल्याने गुन्हयाचे तपासकामी गेले दोन महीन्यांपासुन मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे आदेशाने विश्रांतवाडी पोलीस स्टेशन कडील व गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची वेगवेगळी पथके तयार करण्यात आली होती. आरोपी मनिष चड्डा याचा गोवा राज्य, तामीळनाडू. कर्नाटक राज्य येथे तसेच पुणे शहरात पोलीसांनी कसोशीने शोध घेतला. आरोपी मनिष चड्डा हा उच्च शिक्षीत व हॉटेल क्षेत्रातील माहीतगार इंग्रजी ऊत्तम बोलणारा व प्रभावी व्यक्तीमत्वाचा असल्याने त्याने गोवा, कर्नाटक, तामीळनाडू या ठिकाणी हॉटेलमध्ये मुक्काम करुन खोटा चेक देवुन तेथुन फरार झाला होता. त्याने गोवा येथुन भाडे तत्वावर मारुती स्विफ्ट कार घेवुन कर्नाटक, तामीळनाडू मार्गे तो मुलगा अमन वय १५ वर्षे व मुलगी युक्ता वय १७ वर्षे यांचेसह जमशेटपुर झारखंड येथे वास्तव्य करीत होता. त्याने चोरलेली स्विफ्ट कार ही दिड लाख रुपयांस मणिपाल कर्नाटक येथे गहाण ठेवुन मिळालेल्या पैशातुन स्वतःहाचा व मुलांचा उदरनिर्वाह करीत होता.

दिनांक २०/११/२०१७ रोजी मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, पंकज डहाणे यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, आरोपी मनिष चड्डा हा त्याचे मुलांसोबत जमशेटपुर येथे रहात आहे. त्यानुसार मा. सहा. पोलीस आयुक्त गुन्हे १, समीर शेख, पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम दरोड प्रतिबंधक पथक, गुन्हे शाखा पुणे शहर व पोलीस उप निरीक्षक विशाल मोहीते विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे यांचे पथक तातडीने रवाना केले.

पुणे पोलीस पथक जमशेदपूर येथे गेले असता आरोपी अगोदरच्या दिवशीच जमशेदपूर येथून निघून गेले होते. आरोपी मनीष चड्डा याची गाडया भाडयाने घेवून त्या विकण्याची सवय (मोडस) स्थानीक भाडे तत्वावर गाडया देणा-या व्यवसायिकांशी संपर्क साधून त्यांना आरोपीबाबत सतर्क करण्यात आले होते. त्यातील एकाने बातमी दिल्याने आरोपीला धनबाद येथे पकडण्यात आले.

वरील दाखल गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली असुन त्याची दिनांक १८/११/२०१७ रोजी पर्यंत पोलीस कोठडी घेण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संगीता पाटील विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे या करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, मा. सह पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त श्री प्रदिप देशपांडे,मा.पोलीस उप-आयुक्त श्री.दिपक साकोरे, मा. पोलीस उप आयुक्त श्री.पंकज डहाणे, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सपोआ गुन्हे-१, समीर शेख, सपोआ गणेश गावडे, खडकी विभाग, दरोडा प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम व पोलीस उप निरीक्षक विशाल मोहीते विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे यांनी केली आहे.

